# छंद पुष्परचनेचा - १५



यावेळी आपण गोल आकाराच्या रचनांविषयी माहिती घेणार आहोत. रचनेचा आकार गोल ठेवून त्यात अनेक प्रकारची आपल्या आवडीनुसार फुले, पाने वापरता येतात.

साध्या गोल प्लेटमध्ये फ्लोरल स्पंज (ओॲसिस) ठेवून किंवा परडीमध्ये, कोणत्याही कमी उंचीच्या गोल पुष्पपात्रात अशा प्रकारची रचना चांगली दिसते.

अशा प्रकारची रचना करताना रचनेचा आकार किती लहान, मध्यम किंवा मोठी त्यानुसार फुलांची संख्या अंदाजे ठरवावी लागते. तसेच फुलांच्या आकारावर पण ही संख्या अवलंबून असते. गुलाब वापरायचे असतील तर जास्त फुले लागतात. त्याउलट जर्बेराची किंवा लिलीची फुले मोठी असतात त्यामुळे कमी फुलांमध्ये सुद्धा रचना होऊ शकते.

अशा तऱ्हेच्या रचनांमध्ये अनेक प्रकारच्या फुलांची रंगसंगती विचारात घेऊन रचना करता येतात.

सोबतच्या फोटोंमध्ये जर्बेरा, गुलाब, कार्नेशन, फिलर्स आणि ग्रीन मटेरियल वापरुन लहान-मोठ्या गोल रचना केल्या आहेत.





फोटो क्र. १

फोटो क्र. १ मध्ये फक्त लाल आणि पिवळा गुलाब वापरुन रचना केली आहे.



फोटो क्र. २

फोटो क्र. २ मध्ये लाल आणि पिवळ्या गुलाबाबरोबरच पांढरा जर्बेरा सुद्धा वापरला आहे.



फोटो क्र. ३

फोटो क्र. ३ मध्ये पिवळा आणि गुलाबी जर्बेरा वापरुन रचना केली आहे.



फोटो क्र. ४

फोटो क्र. ४ मध्ये जर्बेरा आणि कार्नेशन वापरुन रचना केली आहे.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर
asdssd@gmail.com